cmyk

# वीजजोडणीच नसलेल्या चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला महावितरणने पाठवले ९० हजारांचे बिल?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४९ ■ बुधवार दि.२८ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 249 ■ Wednesday Dt.28 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# वीज जोडणी नसतानाही विज बिल पाठवणं म्हणजे हे तर मूर्खपणा शब्दांच्या पलीकडले?

## पाच वर्ष वीजच नाही तरी ९० हजार रुपयांचे बिल; आरोग्य विभाग कोमात अन् महावितरण जोमात?

- प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणीच नाही, मिटर नाही मग ९० हजार रुपये वीजबिल कसे?
- वीज नसेल आणि इतर सुविधा नसतील तर अशा आरोग्य केंद्रांच्या बुजगाण्यांचा काय फायदा?
- वीज वितरण कंपनीच्या अनागोंदी आणि संतापजनजक प्रकाराचं धडधडीत वास्तव
- वीज जोडणी नसताना विजेचं बिलं पाठवणं म्हणजे, गोरखधंदा सुरू आहे का?

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रात एक असं प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. जे जगावेगळं आहे. बीड तालुक्यातील चऱ्हाटा या आरोग्य केंद्राची उभारणी पाच वर्षांपूर्वी झाली. भलीमोठी इमारत विस्तीर्ण जागा असं असूनही इथं विजेचा पत्ताच नाही. महत्त्वाचं म्हणजे जेव्हापासून ही इमारत उभारली गेली तेव्हापासून आजतायगायत इथं विजेचा मीटरच बसवला गेलेला नाही. त्यामुळे इथल्या लाईट्स, पंख्यांसह आरोग्याच्या सगळ्या यंत्रणा बंद आहेत. असं असलं तरी, धक्कादायक म्हणजे या आरोग्य केंद्राला लाईटचं बिल आलं आहे. तब्बल ९० हजारांचं बील आलं आहे.

बीड तालुक्यातील चऱ्हाटा गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाहणीसाठी गेले, तेव्हा त्यांना जे वास्तव दिसलं ते पाहून कुणाच्याही तळपायाची आग मस्तकात जाईल. या आरोग्य केंद्राची उभारणी पाच वर्षांपूर्वी झाली. प्रशस्त इमारत आणि विस्तीर्ण जागा असं या आरोग्य केंद्राचं स्वरूप आहे. पण सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे जेव्हापासून या इमारतीची उभारणी झाली तेव्हापासून इथं विजेची जोडणी झालेलीच नाही. त्यामुळे या रुग्णालयात पंखे लावले आहेत. ट्युबलाईट जोडलेल्या आहेत पण त्या बंद म्हणजे अगदी बंद अवस्थेत आहेत.

डॉ. मदन काकड, आरोग्य अधिकारी यांनी बोलताना सांगितले आहे, त्यावेळेस ते म्हणाले की, हे तर झालं वीज वितरण कंपनीच्या अनागोंदी आणि संतापजनजक प्रकाराचं धडधडीत वास्तव समोर आलं आहे. पण इथं



येणाऱ्या रुग्णांना वीजच नसल्यामुळे आरोग्याच्या सेवा मिळत नाहीयत. त्यामुळे त्यांना उपचारासाठी लांबचा पल्ला गाठत बीडला जावं लागतंय. रुग्णासोबत बातचीत केल्यांनतर ते म्हणाले की, अचानक पेशंट आले तर त्यांना उपचार द्यायचे कसे आधीच वीज नाही. मग सोनोग्राफीसारख्या मशिन्स बंद असतात. त्यामुळे पेशंटला बीडला पाठवावं लागतं. असं आरोग्य सेविका सांगतात.

आरोग्यसेविका एम. एम. तांदळे, यांनी लोकशाही मराठीसोबत संवाद साधला आहे, त्यावेळेस ते म्हणाल्या की, एकतर देशातील प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. ती सरकारची सर्वस्वी जबाबदारी आहे. त्यासाठी सरकार ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांची उभारणी करतं. पण तिथं जर वीज नसेल आणि इतर सुविधा नसतील तर, अशा आरोग्य केंद्रांच्या बुजगाण्यांचा काय फायदा आणि त्यातही वीज जोडणी नसताना विजेचं बिलं पाठवणं म्हणजे, हे तर मूर्खपणा शब्दाच्या पलीकडचंच झालं.



---

### नेकनूरमध्ये रात्रीच्या वेळी घरात घुसून पुन्हा चोरट्याने लाखोचा ऐवज पळवला

## एस.पी. साहेब बालाघाटावरील चोरीच्या घटनांना आळा बसणार का?

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावर सध्या चोरट्याचा धुमाकुळ पाहीला मिळत असुन रोज कुठेना कुठे चोरीची घटना झाल्याची पाहावयास मिळत असुन चौसाळा परिसरातील पालसिगन येथे पवनचक्कीचे क्रास आर्म कट करून २ हजार १३२ फुट ऐल्युमिनियम तारेची चोरी प्रकरणाची घटना ताजी असतानाच चौसाळा येथिल सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना बायपास वरती लुटण्याचा प्रयत्न झाला तसेच हिंगणी रस्तयावर दोन झोडप्याना अडवुन त्यांना देखील लुटण्यात आले या घटनेबरोबरच लिंबागणेश येथिल पवनचक्की प्रकलपावरती चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरटयावरती गोळीबारात घटना घडली.



या घटनेत एक चोरटा जागीच मरण पावला या घटनेबरोबरच नेकनुर याठिकाणी गुळवे कुटुंबाच्या घरी चोरीच्या उद्देशाने आलेल्या चोरटयाला गुळवे कुटुंबाने स्वत: हा पकडले या सर्व घटना ताज्या असतानाच आता नेकनुर शहरात चोरटयानी दोन घरामध्ये चोरी करून लाखोचा ऐवज लपास केल्याची घटना (दि.१९)रोजी उघडकीस आली असुन नेकनुर येथिल सितादेवी वस्ती येथिल ज्ञानोबा शिंदे यांच्या घराचे कुलूप तोडुन चोरटयानी २३ ग्रेम सोन्याचे दागिने चोरटया नी लंपास केले यानंतर चोरटयानी शेजारी राहणारे श्रीराम शिंदे याच्या घराकडे आपला मोर्चा वळविला त्यांच्या घराचे कुलुप तोडुन घरामध्ये प्रवेश करत कपाटातील रोख रखम लंपास केली आहे.या घटनेमुळे नागरिकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन विशेष म्हणजे घटना झाली ते ठिकाण व नेकनुर पोलिस स्टेशनंचे अंतर एक कि. मी चे असतानाही याठिकाणी पोलीसाची गस्त होत नसल्यामुळे नागरीकानी याठिकाणी गस्त वाढविण्याची मागणी केली आहे.

नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील चौसाळा परिसर, लिंबागणेश परिसरामध्ये चोरीच्या घटना वाढल्याचे चित्र पाहावयास मिळत असुन चौसाळा बायपास वरतीतर अनेक लोकांना लुटयाचे प्रकार होत असतानाही याठिकाणी चेकपोष्ट देण्यात आलेले नाही यामुळे शेजारी असलेल्या धाराशिव जिल्हयातुन काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक येवुन बालाघाटावर चोरया लुटमार करत असल्यामुळे या लोकांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा व गस्त वाढविण्यात यावी कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक साहेब बालाघाटावरील चोरयाची मालिका थांबणार का? असा प्रश्न सर्व सामान्य नागरिक विचारताना पाहावयास मिळत आहे.

---

## आठवडाभरात कोरोना रुग्ण संख्येत देशात तिपटीने वाढ महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

मुंबई । प्रतिनिधी

देशभरात कोरोना विषाणूच्या सक्रिय रुग्णांची संख्या १२०० वर पोहोचली आहे. सक्रिय रुग्णांच्या बाबतीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे ३२५ रुग्ण आहेत. त्यापैकी ३१६ रुग्ण एकट्या मुंबईत आहेत. यानंतर केरळमध्ये सर्वाधिक ४३० कोरोना रुग्ण आहेत. मंगळवारी महाराष्ट्रात ६६, कर्नाटकात ३६, गुजरातमध्ये १७, बिहारमध्ये ५ आणि हरियाणामध्ये ३ नवीन रुग्ण आढळले. ईशान्येकडील राज्यातही कोरोनाचे रुग्ण समोर येऊ लागले आहेत. मंगळवारी अरुणाचल प्रदेशात २ महिला कोरोना पॉझिटिव्ह आढळल्या. त्यापैकी एका महिलेला ताप आणि सौम्य खोकला आहे, तर दुसऱ्या महिलेला कोणतीही लक्षणे नाहीत.

मंगळवारी उत्तर प्रदेशातील फिरोजाबादमध्ये ७८ वर्षीय कोरोना पॉझिटिव्ह वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राज्यातील कोविडच्या नवीन प्रकारामुळे हा पहिलाच मृत्यू आहे. याशिवाय महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि मध्य प्रदेशात एकूण ११ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. एकूण मृतांचा आकडा १२ वर पोहोचला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या २९-३० मे रोजी होणाऱ्या उत्तर प्रदेश-बिहार दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य आरोग्य विभागही सतर्क आहे. पंतप्रधानांच्या १०० मीटरच्या आत राहणाऱ्या सर्व लोकांची कोरोना चाचणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

२६ मे रोजी जयपूरमध्ये दोन कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला. त्यापैकी एक रेल्वे स्टेशनवर मृत आढळला. त्याचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. दुसरा मृत्यू एका खाजगी रुग्णालयात दाखल असलेल्या २६ वर्षीय तरुणाचा होता. त्याला आधीच टीबीचा आजार होता. त्याच वेळी, महाराष्ट्रातील ठाणे येथे उपचारादरम्यान एका कोरोना पॉझिटिव्ह महिलेचा मृत्यू झाला.

---

## ग्रामसेवक कोकाटे व प्रशासक केशोड यांना मातंग समाजाची अस्मिता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा विटाळ?

### मागील तीन वर्षांपासून स्मारकाच्या सुशोभीकरणास निधी टाकण्यास टाळाटाळ त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी या ठिकाणी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक असून आज तीन वर्षापासून मातंग समाजाच्या वतीने सुशोभीकरणासाठी ग्रामपंचायत चा निधी देण्यात यावा म्हणून वारंवार मागणी करण्यात येत आहे. परंतु ग्रामसेवक कोकाटे व प्रशासक केशोड यांच्याकडून जाणून-बुजून टाळाटाळ करण्यात येत आहे. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती ऑगस्ट महिन्यात भारतातच नाही तर रशिया सारख्या बलाढ्य देशात मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात येते यासाठी अवघे दोन महिने शिल्लक असून या स्मारकाचा सुशोधिकरणाचा विषय अत्यंत गंभीर असून ग्रामपंचायत कडून वारंवार दुर्लक्ष करण्यात येत आहे.

मातंग समाजाची अस्मिता असणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी ग्रामपंचायतला निधी देण्यात यावा



म्हणून ग्रामसभेत ठरावांमध्ये वारंवार नोंद करण्यात आली ठरावा मध्ये नोंद घेण्यात येते परंतु आराखड्यामध्ये टाकण्यात येत नाही हे काम वगळण्यात येते. समाज बांधवांकडून त्याचा पाठपुरावाही करण्यात आला परंतु ग्रामसेवक व प्रशासक हे मातंग समाजाच्या वस्तीमध्ये विकास कामासाठी निधी देण्यास कुचराई केली जाते मातंग समाजाकडे द्वेषाने पाहत असून यामध्ये जाणून-बुजून टाळाटाळ करण्यात येत आहे. पुरुषोत्तमपुरी या गावांमध्ये सध्या सरपंच व सदस्य नसून प्रशासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मागील तीन वर्षापासून ग्रामपंचायत चा संपूर्ण कारभार या दोघांच्या हातात असून यांनी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार या ग्रामपंचायत मध्ये केलेला असून याच्या तक्रारी पण बीडिओ कडे आहेत पण याकडे बीडिओ पण जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. जिथे आवश्यकता नाही तिथे ग्रामपंचायतचा फंड वापरण्यात येत आहे तसेच एकाच ठिकाणी अनेक वेळा कामे करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार ग्रामसेवक व कोकाटे यांनी केलेला आहे असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांची सखोल चौकशी करून यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अन्यथा मातंग समाज बांधवांच्या वतीने पंचायत समिती कार्यालय माजलगाव व जिल्हाधिकारी बीड यांच्यासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी पुरुषोत्तमपुरी येथील समाज बांधवांनी दिलेला आहे.

cmyk

## चव्हाणवाडी येथे गं भा रेऊबाई चव्हाण यांचा सहस्त्र चंद्रदर्शन व सुवर्ण तुला सोहळा संपन्न

# जिवंतपणी आई-वडिलांची सेवा करणे हाच कलियुगात ईश्वर प्राप्तीचा मोठा मार्ग : रूपालीताई सवणे पाटील

बीड । प्रतिनिधी
मौजे चव्हाणवाडी येथे गं भा रेवुबाई कमळाजी चव्हाण यांचा सहस्त्र चंद्रदर्शन व सुवर्ण तुला सोहळा दिनांक २८ रोजी अतिशय थाटात व संत महंतांच्या उपस्थितीत पार पडला रेवबाई चव्हाण यांचे वय १०५ वर्ष असून त्यांची तब्येत आजही ठणठणीत आहे.
या सोहळ्या निमित्त प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प सौ रूपालीताई सवणे पाटील यांचे कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी कीर्तनकार रूपालीताई पाटील म्हणाल्या की काही लोक जिवंतपणे आई-वडिलांना वृद्ध आश्रमात ठेवतात त्यांची हेळसांड करतात व अगणित पाप आपल्या डोक्यावर घेतात. आई वडील गेल्या नंतर त्यांच्या पश्चात मोठे मोठे पुण्यतिथीचे कार्यक्रमाचे आयोजन करून लोकांना गोड गोड अन्न खायला घालतात ही गोष्ट अत्यंत चुकीची असून



आपले आई वडील जोपर्यंत जिवंत आहेत तोपर्यंत त्यांची मनोभावे सेवा करून त्यांचे आशीर्वाद घेणे हाच कलियुगा मधील ईश्वर प्राप्तीचा मोठा मार्ग असून या चव्हाण कुटुंबाने रेवबाई यांचा१०५ वा वाढदिवस सहस्त्र चंद्रदर्शन व सुवर्ण तुला करून हा भव्य दिव्य कार्यक्रम घेऊन मातृ ऋणातून थोडे उतराई होण्याचे काम केले आहे हे निश्चितच कौतुक करण्या जोगे आहे असे प्रतिपादन यावेळी रूपालीताई सवणे पाटील यांनी केले.
रेऊबाई चव्हाण यांचा चार मुले चार सुना नातवंडे, नाथसुणा व पणतू असा मोठा परिवार आहे.
या भव्य सोहळयासाठी भागवताचार्य ह भ प कल्याण महाराज देवडकर. ह भ प चंद्रहास महाराज, ह भ प रामेश्वर महाराज सवणे, कुक्कडगाव चे माजी सरपंच अशोक दादा कुलकर्णी, समाजभूषण अण्णा मामा देवगुडे, बोरगाव येथील सरपंच नंदकुमार गाडे, सुदाम पाटील गाडे, माजी सरपंच वशिष्ठ, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड. राजाभाऊ कुठे, प्रदीप कुलकर्णी, नंदकुमार कुलकर्णी, पी डी शिंदे सर, दत्ताभाऊ शिंदे, बाळू जिजा गाडे, गणेश तोडेकर यांच्यासह अनेक मान्यवर व माता-भगिनी उपस्थित होत्या. यावेळी आलेल्या सर्वांचे आदरातिथ्य पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक श्री बाबुशेठ चव्हाण दत्ता चव्हाण अनिल चव्हाण बाळू चव्हाण बळीराम चव्हाण व समस्त चव्हाण कुटुंबीयांनी केले.



# ना.पंकजाताई मुंडे यांनी केले बनसोडे, स्वामी आणि मुंडे कुटुंबियांचं सांत्वन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
परळी तालुक्यातील नागापूर येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. गणपत बनसोडे यांचे नुकतेच दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले होते, आज परळी दौर्‍यात पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेतली व सांत्वन करत धीर दिला. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना त्यांनी व्यक्त केली.
वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून देखील त्यांनी जवाबदारी निभावली होती. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते असा त्यांचा परिचय सर्वज्ञात होता. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना पंकजाताई यांनी व्यक्त केली.
तसेच नागापूर येथील शिवदास स्वामी यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई स्वामी यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले होते, त्यांच्या कुटुंबियांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी सांत्वनपर भेट घेतली. तर नाथरा येथील जेष्ठ नागरिक स्व. वसंतराव धोंडिबा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. स्वामी आणि मुंडे कुटुंबियांचे सांत्वन करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करत दोन्ही कुटुंबांना धीर दिला. तसेच यादरम्यान नागापूर, नाथरा येथील ग्रामस्थ नागरिकांशी भेटून ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

# ढेकणमोहा येथे अहिल्याबाई होळकर जयंतीचे आयोजन

## अध्यक्ष भारत देवकते सचिव अभिषेक देवकते यांची निवड

ढेकणमोहा । प्रतिनिधी
बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे प्रति वर्षी प्रमाणे या वर्षी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती दि. २ जुन २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरी होत असून या जयंती उत्सव समितीची बैठक हानुमान देवकते, कैलास देवकाते, भगवान देवकाते, रमेश देवकते, किसन देवकते, भास्कर देवकते यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी भारत दादा देवकते, उपअध्यक्ष गणेश चौरे तर सचिवपदी अभिषेक देवकते यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.







सहसचिव रामा चौरे, संघटक ज्ञानेश्वर देवकते, सदस्य नारायण देवकते, सतिश देवकते, सुभाष देवकते, मनोज देवकते, दिलीप देवकते, शामराव देवकाते, प्रल्हाद देवकते, महादेव देवकते, महेंद्र देवकते, करण देवकते, आकाश देवकते, गोरख चौरे, अक्षय देवकते पाटील, मुकेश पिंगळे, कुषणा देवकते, योगेश देवकते, दिपक चौरै, ओमकार चौरे, बाबासाहेब रानमारे, राहुल शिंदे, अनंत देवकते, दिपक देवकते, दत्ता देवकते, पवन देवकते, अनिल देवकते, करण चौरै, रितेश देवकते, लखन देवकते, प्रविण देवकते, आकाश देवकते, सुरज देवकते, नाना चौरे, सिद्धेश्वर देवकते, दादा चौरै, पवन चौरे यांची निवड करण्यात आली असुन तरी जयंती आयोजित करण्यात आली असुन सकाळी ९.वावता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करुन सायंकाळी पाच वाजता भव्य मिरवणूक होईल तरी परीसरातील सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन जयंती उत्सव समिती ढेकणमोहा यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# मुहम्मद उमर सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.०४% विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी



सीबीएसई दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात बीड शहरातील नामांकित अपेक्स बालरुग्णालयाचे डॉ. मुहम्मद इज़हार जावीद आणि डॉ. नाज़ीया मुहम्मद इज़हार जावीद (त्वचा रोग तज्ञ) यांचा गुणवंत मुलगा मुहम्मद उमर याने सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.४% गुण घेत विशेष प्राविण्याने घवघवीत यश संपादन केले आहे. मुहम्मद उमर याने पुढील जीवनात वडिलांप्रमाणेच डॉक्टर होऊन बालरोग तज्ञ होण्याचा मानस व्यक्त केला आहे.
मुहम्मद उमरच्या अलौकिक यशाबद्दल त्याचे आजोबा ऑडिटर मुहम्मद अब्दुल गफ्फार, मोठे काका अपेक्स मेडीकलचे मालक अब्दुल खालेक, लहान काका डॉ. मुहम्मद अब्दुल माज़ीद (मेंदू विकार शल्यचिकित्सक) मॅक्स कॅयर हॉस्पिटल, अहेमदनगर व लहान काकी, डॉ. मरियम मुहम्मद अब्दुल माजीद (स्त्री रोग तज्ञ) मॅक्स कॅयर हास्पिटल, अहेमदनगर आणि (नेत्र तज्ञ) अज़हर जमील व (इंजिनियर) शाहेद लतीफ आणि पोद्दार इन्टरनॅशनल स्कुल बीड चे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, नातेवाईक, मित्र परिवाराकडून त्याचे अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्हा भाजपा व संस्कार भारतीच्या वतीने महिला मेळावा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

# महिला मेळावा व रांगोळी स्पर्धेत शालीय विद्यार्थिनी व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे : देशमुख

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने महिला मेळावा व रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आजच्या पिढीला समजन्यासाठी भारतीय जनता पार्टी विविध कार्यक्रम आयोजित करत आहे. सदर रांगोळी स्पर्धा ही दोन गटात होणार असून वय वर्ष पाच ते पंधरा असा मुलींचा गट असून पंधरा वर्षांपूर्वी महिलांचा दुसरा गट करण्यात येणार आहे.



या दोन्ही गटात सहभागी होणाऱ्या मुली व महिलांसाठी स्वतंत्रपणे बक्षीस दिले जाणार असून बीड शहरातील व जिल्ह्यातील मुली आणि माहीलानी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे आध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे. भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारतीयांच्या स्वस्त विद्यमान आयोजित करण्यात आलेली ही रांगोळी स्पर्धा दिनांक ३० मे रोजी सकाळी अकरा वाजता अमृत मंगल कार्यालय येथे होणार असून दुपारी दोन वाजता महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी संस्कार भारतीची सर्व टीम भारतीय जनता पार्टीला सहकार्य करत असून संस्कार भारती व भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी देखील या स्पर्धा आणि मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शंकरराव देशमुख यांनी केले आहे.

# अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल - प्रा ईश्वर मुंडे

किल्ले धारूर । प्रतिनिधी
तालुक्यातील आसरडोह येथे मागील पंचवीस वर्षापासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली जाते. या वर्षी दि.२६ मे २०२५ सोमवार रोजी आसरडोह येथील जयंतीचा रौप्य महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.
या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पदावरून बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की, लोकशाहीमध्ये जनतेने प्रमाणिक उमेदवाराला आपले बहुमूल्य मतदान देवून विजयी करणे हेच देश कार्य आहे.अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर राष्ट्र माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अपेक्षित सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल. सद्य स्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा प्रशासकीय कार्याचा वारसा प्रभावीपणे चालवणाऱ्या अधिकाऱ्याला प्रती वर्षी आपल्या समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्यात यावा.या मुळे अधिकारी-कर्मचारी यांचे मनोबल वाढून त्यांच्या हातून जन हिताची कामे अधिक होतील.अशी संकल्पना मांडली.
या संकल्पनेला उपस्थितांनी टाळयाच्या कडकडाटात प्रतिसाद दिला व सन २०२५ चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ऊत्कृष प्रशासक पुरस्कार धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री देवीदास वाघमोडे यांना सर्वानुमते जाहीर करण्यात आला. लवकरच त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास जेष्ठ नेते माऊली तात्या गडदे,सरपंच रविकिरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.
या कार्यक्रमात परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व नवीन नौकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचा -हदय सत्कार करण्यात आले.

# चेक बाउन्स प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता : अ‍ॅड. सावंत

बीड । प्रतिनिधी
दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंन्ट ऍक्ट प्रकरणामध्ये महत्त्वपूर्ण निकाल दिलेला असून आरोपीची अनादरीत धनादेशा प्रकरणी निर्दोष मुक्तता केलेली आहे, प्रकरणाची हकीगत अशी की, सुनील महादेव नागरगोजे राहणार तिंतरवणी यांनी दिनांक ११/०१/२०१९ रोजी फिर्यादी बँक, स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड यांच्याकडून वाहन खरेदीसाठी कर्ज घेतले होते.
सदरचे कर्ज घेतेवेळी आरोपीकडून फिर्यादी पतसंस्था बँकेने सिक्युरिटी म्हणून एकूण २४ धनादेश घेतले होते. आरोपी यांनी मुदतीत कर्ज फेडले नाही म्हणून फिर्यादी बँकेने सदर धनादेशा पैकी एक धनादेश बाउन्स करून आरोपीचे विरोधात मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयात समरी केस क्रमांक २७१/२०२० स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड विरुद्ध सुनील महादेव नागरगोजे दाखल केला मा. न्यायालया मध्ये सदरचा खटला चालला परंतु आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला डिफेन्स व युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केलेली आहे, सदरच्या प्रकरणामुळे बँकांनी सिक्युरिटी म्हणून घेतलेल्या धनादेशाचा बँका गैरवापर करत असल्याणे बँकांना ही मोठी चपराक मानली जाते. आरोपीच्या वतीने ड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली. त्यांना अ‍ॅड. विशाल कदम, अ‍ॅड. अभिषेक बहिर, अ‍ॅड. माऊली डाके, अ‍ॅड. मुकुंद लोणकर, अ‍ॅड. राजकुमार धरणे, अ‍ॅड. प्रदीप दराडे, अ‍ॅड. राम खोसे यांनी सहकार्य केले.

# सिरसाळ्यात मार्केटला जाणाऱ्या रसत्यात घाणीचा विळखा; दुर्गंधी वासाने नागरीक परेशान

सिरसाळा । प्रतिनिधी
सिरसाळा येथील जुण्या बस्ट्यांडकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले असून, यामुळे परिसरात दुर्गंधीचा तीव्र वास येत आहे. या प्रकारामुळे मार्केटमध्ये ये-जा करणाऱ्या नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे, या रस्त्यावर शासकीय आरोग्य केंद्र, मेडीकल सोनार लाईन, फटो स्टुडीओ, खताची,बि बियाणे, सेमेंट फरशी, कलर ची दुकाने आहेत. घाणीमुळे व्यापारी वर्ग व नागरीकांना नाहक त्रास सहन करावे लागत आहे. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत



असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.
गेल्या अनेक दिवसांपासून सिरसाळा येथील मुख्य ममार्केटला जाणाऱ्या रस्त्याच्यावर कचरा साचले आहे. यामुळे या भागात दुर्गंधी पसरली असून, डासांचा प्रादुर्भावही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या रस्त्यावरून दररोज हजारो नागरिक आणि शेतकरी ये-जा करतात. घाणीमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. लहान मुले आणि वृद्धांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतीकडे या समस्येबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, असे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायत फक्त कर गोळा करते, पण मूलभूत सुविधा पुरवण्यात पूर्णपणे अपयशी ठरली आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया एका स्थानिक व्यापाऱ्याने दिली.
या दुर्गंधीमुळे परिसरातील व्यावसायिकांवरही परिणाम होत आहे. अनेक ग्राहक घाणीमुळे या रस्त्यावरून जाणे टाळत असल्याने व्यवसायावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. नागरिकांनी ग्रामपंचायतीला तात्काळ यावर लक्ष देऊन कचरा उचलण्याची आणि परिसरात स्वच्छता राखण्याची मागणी केली आहे. अन्यथा, तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



# जायकवाडीच्या पाण्यासाठी संघर्ष!

## १४० गावातील शेतकरी आक्रमक, बीडमध्ये महायुतीच्या जाहिरनाम्याची होळी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील १४० गावातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. जायकवाडी धरणाचे पाणी (गरळजुरवळ ऊा थरींशी) शेतीला मिळावे, या मागणीसाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे गेल्या चार दिवसांपासून उपोषण सुरु आहे. उपोषणाकडे सरकार दुर्लक्ष करत असल्यानं शेतकऱ्यांनी महायुतीच्या जाहिरनाम्याची होळी केली. यावेळी आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी विमानतळ नको, पाणी द्या, असा टाहो फोडल्याचं पाहायला मिळालं. गेल्या चार दिवसापासून अजय पाटील साळुंके हे उपोषण करत असून त्यांची प्रकृती खालावली आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी परिसरातील ग्रामस्थ एकत्रित आले आहेत. जायकवाडी किंवा कृष्णा खोऱ्यातील पाणी शेतीला मिळावे. यासाठी वर्षभरापासून १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरु केले आहे. यासह शेतकरी कर्जमाफी, नदीजोड प्रकल्प या मागण्याही शेतकऱ्यांच्या आहेत. याकडे लोकप्रतिनिधी, शासन व प्रशासन लक्ष देत नसल्याने १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत आज तांदळा येथे महायुती सरकारच्या जाहिरनाम्याची होळी केली. या मागण्यांकडे लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.



आशिया खंडातील सर्वात मोठं मातीचं धरण अशी ख्याती जायकवाडी धरणाची आहे. या धरणाचा आराखडा सर्वात पहिल्यांदा जुन्या हैदराबाद राज्याने तयार केला होता. तत्कालीन बीड जिल्ह्यातील 'जयकुचीवाडी' या खेड्याजवळ गोदावरी नदीवर २,१४७ दशलक्ष घनमीटर जलसाठा असलेलं धरण बांधण्याची योजना होती. अर्थातच जयकुचीवाडी या खेड्याच्या नावावरून प्रकल्पाला जायकवाडी हे नाव देण्यात आलं. पुढे राज्य पुनर्रचनेनंतर आणि विविध पर्यायी जागांचा अभ्यास केल्यानंतर हे धरण जयकुचीवाडीऐवजी वरील बाजूस असलेल्या पैठण येथे बांधायचे निश्चित झाले. ठिकाण बदलले तरीही प्रकल्पाचे नाव तेच ठेवण्यात आले. हे धरण बांधण्यासंबंधीचा प्रकल्प अहवाल १९६४ मध्ये पूर्ण झाला. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त मराठवाडा भागातील शेतीसाठी जमीन बागायती करणे हा धरण बांधण्यामागील मुख्य हेतू होता. तसेच जवळपासची शहरे आणि खेड्यांना, औरंगाबाद व जालना नगरपालिका व औद्योगिक क्षेत्राला पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी पाणीपुरवठा करणे हाही उद्देश होता. जायकवाडी धरणाचा पाया तत्कालीन पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी १८ ऑक्टोबर १९६५ रोजी घातला होता. धरणाच्या उद्घाटनाचे काम तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २४ फेब्रुवारी १९७६ रोजी केले होते. धरणातील ८०% पाणी सिंचनासाठी, ५–७% पिण्याच्या पाण्यासाठी आणि उर्वरित औद्योगिक कामांसाठी दिले गेले आहे.


धरणातून सरासरी दररोज सुमारे १.३६ एमसीएम स्राव होत असून त्यापैकी ०.०५ एमसीएम पाणी एमआयडीसी क्षेत्राला दिले जाते, तर औरंगाबादच्या गरजा भागविण्यासाठी ०.५५ एमसीएम वाटप केले जाते, तर उर्वरित रक्कम बाष्पीभवनात हरवते.

# कार्यकर्त्यांच्या स्वप्नांना आकार देणार नेतृत्व म्हणजे आपले बाजीराव चव्हाण : भोसले

बीड । प्रतिनिधी

राजकारण म्हटलं की नेता आणि कार्यकर्ता हे समीकरण आलंच. कार्यकर्त्यांना समजून घेऊन त्यांचे प्रश्न व्यवस्थित सोडवुन देणारे नेते काही वेगळेच असतात. अगदी तसेच बीड मधील जनसामान्य कार्यकर्त्यांची तळमळ आणि जाण असणारा नेता म्हणजे बाजीराव दादा चव्हाण. दादांना भेटण्यासाठी दादांच्या कार्यालयात येणाऱ्या कार्यकर्त्यांची गर्दी पाहिली की येथेच कार्यकर्त्यांना योग्य न्याय मिळतो, ही भावना प्रत्येकाच्या मनात तयार होते. आपण दादांच्या कार्यालयाबाहेर गेलो की कायम आपल्याला जनसामान्यांची आपल्या प्रश्नाला घेऊन गर्दी बघायला मिळते. हीच गर्दी असते गोरगरिबांची ही गर्दी असते श्रीमंतांची पण न्याय एकच सगळे समान..

दादा हे हसतमुख आहेतच तसेच माणसे ओळखण्यातही पटायित आहेत. समोरच्या माणसाला अवघ्या काही क्षणातच ओळखतात. एखाद्या कार्यकर्त्याचे काम राहिले तर त्याला आवर्जून बोलावून घेऊन त्याचे काम करतात. जेव्हा दादांच्या समोर एखादा कार्यकर्ता किंवा जनसामान्य माणूस जातो तेव्हा कोणतीच भीती मनामध्ये कधीच राहत नाही. दादांच्या आखाड्यातील माती काही वेगळीच आहे. आणि याच मातीतून एक सच्चा आणि निष्ठावंत कार्यकर्ता तयार होण्यास खूप मदत होते.



बाजीराव दादा चव्हाण यांचे कार्य आरोग्य सेवेच्या माध्यमातून लाखो रुग्णांना मदत करणे तथा युवा सेना महाराष्ट्रभर मजबूत करण्याचे काम त्यांनी केले. बीड जिल्ह्यामध्ये गेल्या पंधरा–वीस वर्षापासून शिवसेना संपत चाललेली असताना तिला उभारी देऊन जिवंत करून एक नवीन चेतना, नवीन पालवी तयार करण्याचं काम बाजीराव दादांनी केला आहे.

दादांकडे येणारा प्रत्येक माणूस आपला नेता सर्वसामान्यांचा नेता हीच भावना घेऊन येतो. आपली माणसं आपला कार्यकर्ता ही दादांची भावना कायम तुम्हाला स्फूर्ती देते. रोज कितीतरी नवनवीन आपली माणसं जोडणारे बाजीराव दादा एक वेगळेच राजकारणी ठरत आहेत. अशी मातीची जाण राखणारी माणसं आभाळागत मोठी होतात तेही आपल्या माणसांसाठीच... बाजीराव दादांचा नाव ओठावर येताच जणू एक आपल्या घरातीलच तरुण असावा असा भास होतो. आडल्या–नडलेल्यांची सेवा करणारे महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातील रुग्णांसाठी कष्ट घेणारे आणि त्यांच्या मदतीला धावून जाणारे एक वेगळेच नेतृत्व म्हणजे बाजीराव दादा चव्हाण. यामुळे बाजीराव दादा हे सर्वांचे जणू काही सगेच बनले आहेत. नुकतेच बीडमध्ये युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी एका कार्यक्रमातून आपल्या पक्ष वाढीसाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या एक नव्हे, दोन नव्हे तब्बल चार तरुणांना स्कॉर्पिओ गाडी भेट दिल्या आहेत. यातूनच दादांच्या प्रेमळ आणि कार्यकर्ता जपणाऱ्या स्वभावाची ओळख होते.

# भारत झिंदाबाद यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : मायाताई मिसळे

बीड । प्रतिनिधी

बीड भारतीय सैन्याने शौर्य दाखवून पाकिस्तानी दहशतवाद्याना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी बीड शहरात भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन करण्यात आले असून या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपाई बीड जिल्हा अध्यक्ष मायाताई मिसळे यांनी केले आहे.

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची



ठिकाण उद्धस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी यात्रेचे आयोजन केले आहे.

बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी शुक्रवार ठीक ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे. बीड शहरात जिल्हा रिपाइंच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी यांच्यासह रिपाइं कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी, असे आवाहन रिपाई महिला जिल्हाध्यक्ष मायाताई मिसळे यांनी पत्रकातून केले आहे.

# जीवन शिक्षण विद्यालयाचा विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर मुंडेचे सैनिक स्कूल परीक्षेत घवघवीत यश

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रस्थानी असलेल्या व नावाजलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर उनकेश्वर मुंडे यांने सैनिक स्कूल परीक्षेमध्ये घवघवीत यश असून उत्तीर्ण होऊन त्याने गुणवत्ता यादीमध्ये येण्याचा मान मिळवला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेसाठी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात येते यावर्षीची परीक्षा एप्रिल महिन्यामध्ये घेण्यात आलेली होती. या परीक्षेमध्ये जीवन शिक्षण माध्यमिक



व उच्च माध्यमिक विद्यालयाचा गुणवत्ता पॅटर्न पुन्हा एकदा यशस्वी झाला आहे. नवोदय विद्यालय, शिष्यवृत्ती परीक्षा व सैनिक स्कूल परीक्षेमध्ये या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. नुकताच निकाल लागला असून आत्ताचे निकालामध्ये इयत्ता पाचवीचा विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर उनकेश्वर मुंडे याने सैनिक स्कूल परीक्षा उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहे. त्याला नवोदय तज्ञ आदर्श शिक्षक नाथा ढगे यांनी मार्गदर्शन केले.

त्याच्या यशाबद्दल ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव प्रा ईश्वर मुंडे प्राचार्य विजयकुमार मुंडे, उपमुख्याध्यापक अरुण समुद्रे, सहशिक्षक महादेव केदार, भारती सोनवणे, मंगल वटाणे, नाथा ढगे हनुमंत काळे, प्रमोद कोमटवार, लिपिक पोपट कदम, नितीन सुतार, युवराज जाधव इत्यादींनी अभिनंदन करून त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. जीवन शिक्षण विद्यालयाच्या गुणवत्ता पॅटर्नचा डंका आता बीड जिल्ह्यामध्ये पुन्हा एकदा घुमू लागला आहे.

# द्वा.मं.राजस्थानी विद्यालयाच्या गेट टुगेदर समारंभात निवेदक सुरेश साळुंकेंनी भरले आनंदाचे नवरंग

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध स्व द्वा.मं.राजस्थानी विद्यालयामध्ये १९९७–९८ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलन आयोजित केले होते. या गेट टुगेदर कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदक तथा राजस्थानी विद्यालयाचे माजी विद्यार्थी निवेदक सुरेश साळुंकेंना निवेदनासह शालेय जीवनातील खेळ, आठवणींना उजळवण्यासाठी संयोजन समितीने निमंत्रित केले.

निवेदक सुरेश साळुंकेंनी आगदी उद्घाटन सोहळयापासुनच इंद्रधनुष्याचे एक एक मनमोहक रंग भरायला सुरुवात केली. त्यामुळे प्रत्येक क्षण आनंदाने मोहरुन गेला होता. विनोदीशैलीने निवेदन करताना निवेदक सुरेश साळुंकेंनी हृदयास स्पर्श केला आणि म्हणाले प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील




वळनावरचा सळसळता पिंपळ वृक्ष, आम्रवृक्ष, गुलमोहर, बाभळी वृक्ष असतो. यावेळी निवेदक सुरेश साळुंकेंचा त्यांना शिकवलेल्या आर.बी.सोनीसर, रामेश्वरजी कासटगुरूजी, कोकणेसर, भाऊसाहेब पवार, एकशिंगेसरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात शालेय जीवनातील हृदयाच्या एका कोपऱ्यात दरवळणाऱ्या कार्यान्वित केले. परिणामी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी जो आनंद घेतला तो ओसंडून वाहत होता.

निवेदक सुरेश साळुंकेमुळे स्नेहसंमेलनास एक उत्साहाची झालर लागली. सदर कार्यक्रमात गप्पा गोष्टी आणि गाण्याची रेलचेल होती. सर्वच कार्यक्रम रंगल्याने माजी विद्यार्थी वय विसरून शालेय जीवनाप्रमाणे नाचत हुदडत होते.



बीड – नगर रोड वरील चाऊस हॉल शेजारी हॉटेल राजधानी च्या उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा देताना फहीम इनामदार, हज्जू जागिरदार, रौफ जागिरदार, अतिक जागिरदार व मित्र परिवार.



श्याम विद्यालय श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय दहिफळ वड माऊली तालुका केज येथे स्वातंत्र्यवीर वि दा सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बळी गुरुजी, भोसले पी एस सर, श्रीमती ठोंबरे आयडी मॅडम, गदळे के. इ, कल्याण आंधळे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी.,.......... छाया तात्यासाहेब डोईफोडे



# प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ हिंदी शिक्षक महासंघाच्या वतीने सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजित तांबे, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब घाडगे पाटील, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.मिलिंद कांबळे, प्रदेश सचिव रेवंत कर्दळे, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.राजकुमार कांबळे, राज्य कोषाध्यक्ष सुंदर लोधे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे संपन्न झाला. या कार्यक्रम हिंदी शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत राज्यातील दोनशे शिक्षक सहभागी झाले होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जयश्री वाघमारे यांचा शिवसेनेत प्रवेश

## सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांनी केले स्वागत

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला आघाडी बीड तालुकध्यक्ष जयश्री वाघमारे यांनी महिला कार्यकर्त्यांसह राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी मंत्री सिरसाट, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी वाघमारे यांचे शिवसेनेत स्वागत केले.

राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट हे नुकतेच



बीड दौऱ्यावर होते. बीडमध्ये शिवसेनेच्या मार्गदर्शन मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला आघाडी बीड तालुकध्यक्ष जयश्री वाघमारे यांनी महिला कार्यकर्त्यासह शिवसेने मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सचिन मुळूक यांनी जयश्रीताई यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेची ताकद आणखी वाढली असल्याचे सांगितले. कार्यक्रमास पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दर्गा नासरजंग इनाम जमिनी प्रकरणी एस.आय.टी मार्फत चौकशी करा

# अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू : सय्यद सलीम

बीड । प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासरजंग देवस्थान इनामी जमिनी प्रकरणी एस.आय.टी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी तहरीक – ए – इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. असे की, मौजे शिवार परळी ता.परळी.बीड येथील सर्वे नंबर ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, २४०, २५९, ३०३, ३०४, ३८८, ३९५, ३९८ व ३९९ हे सर्व सर्वे नंबर येथील ऐतिहासिक दर्गा नासरजंग ची देवस्थान खिदमत माश इनामी जमीन असून वरील सर्व सर्वे मध्ये खुल्या अवैध प्रकारे खरेदी – विक्री करून तलाठी, तहसीलदार, दुय्यम निबंधक न.प. परळी व भूमी अभिलेख येथील कर्मचारी यांच्या संगनमताने चुकीचे सर्वे करून पी.टी.आर व पी.आर कार्डही सुद्धा देण्यात आली आहे.

वरील सर्वे नंबर मधील मिळकत ही पूर्णपणे



ऐतिहासिक दर्गा नासरजंग देवस्थानाची खिदमत माश इनामी जमिनी असून वरील जमिनीवर लोकांनी अवैध प्रकारे अतिक्रमणे करून मोठ्या प्रमाणात अवैध बांधकाम ही केले आहे. तरी या व प्रकरणी आम्ही संबंधित कार्यालयांना वेळोवेळी निवेदने देऊनही आमच्या निवेदनाचे दखल न घेता अध्याप वरील प्रकरणी कसलीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तरी वरील ऐतिहासिक दर्गा नासरजंग देवस्थान इनाम जमिनी प्रकरणी एस.आय.टी मार्फत चौकशी करून दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे व योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा येत्या ३० मे शुक्रवार रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय बीड समोर तहरीक – ए – इनाम संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय बीड व जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# सुलेमान देवळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवाच झाली मृत्यूचा सापळा : घोडके




दौवावडगाव । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे असणारे प्राथमिक आरोग्य केंद्र येथील ईमारत अतिशय धोकादायक झाली आहे. सध्या पावसामुळे ईमारत आतल्या बाजूने अनेक ठिकाणी पडझड होत असुन या ठिकाणी काम करणे किंवा रुग्णांना सेवा पुरविणाऱ्यासाठी कर्मचाऱ्यांची तारेवरची कसरत होतं असल्याचे दिसून येत आहे तरीही येथील कर्मचारी जीव मुठीत घेऊन रूग्णांना सेवा देत आहेत परंतु खंत ही वाटते की सदर ईमारत ही २०१६ पासुन ही ईमारत ना दुस्तत असुन सुद्धा प्रशासन कर्मचारी व रुग्णाणांच्या अपघाती मृत्यू ची वाट पाहत आहे का...? हे माहिती असुन देखील नवीन ईमारत बांधकाम व्हावे यासाठी समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी गेल्या दोन वर्षांपूर्वी अमर उपोषण करुन या आरोग्य केंद्राची दशा, व्यथा, सरकार व स्थानिक प्रतिनिधी म्हणजेच आष्टी पाटोदा शिरूर येथील आजी माजी आमदार यांना सांगितले होते.

या आरोग्य केंद्राला नविन वास्तू उभारण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी विधानसभेत प्रश्नं मांडुन मंजूरी देखील आणली परंतु पुढे काय झालं..? निवडणूक होताच स्थानिक प्रतिनिधी बदलले अन् प्रश्नं प्रलंबित पडला हा प्रश्नं स्थानिक प्रतिनिधी कोणत्याही पक्षाचा किंवा कोणी ही असो परंतु हा प्रश्नं ४४ खेड्यापाड्याचा मार्गी लावणे खुप गरजेचं आहे असा परखड शब्दात समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

> जीव मुठीत घेऊन रुग्णांना सेवा देण्यासाठी आम्ही तत्पर आहोत परंतु...अशा पडझड झालेल्या वास्तू मध्ये २४ तास राहणं म्हणजे मृत्युला आमंत्रण देणं असे आहे व एखाद्या वेळेस पाऊसा अभावी आम्ही वेळेवर उपस्थित नाही होऊ शकलो तर... समाजाकडुन आम्हाला टोमणे मारले जातात.
> – **डॉ.शेख मॅडम,** (वैद्यकीय अधिकारी सु.देवळा)

> स्थानिक असणारे व मुख्यालय केंद्रामध्ये स्थायिक वास्तव करणारे म्हणतात की हे आरोग्य केंद्र म्हणजे सापाचे अन् मरणाचे माहेर घर झाले असुन येथे २४तास काम करणे म्हणजे धोक्याचे आहे.
> – **निकाळजे,** आरोग्य सेवक

> झोपलेले लोक प्रतिनिधी अन् प्रशासन यांनी मिळून सर्व कर्मचारी यांच्या व रुग्णांच्या जिवित हानी न होण्याबाबतच हमी पत्र द्यावं असं स्पष्ट प्रतिक्रिया दिली.
> – **परमेश्वर रामचंद्र घोडके,** (समाजसेवक)



# अंबाजोगाई नगर परिषदेमधील जातिवाद बंद करा : राजेश वाहुळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगरपरिषद सध्या कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत येत आहे त्यातच एक कारण म्हणजे आंबेजोगाई नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक असलेले सोनकांबळे साहेब यांचा तडकाफडकी चार्ज बदलला आंबेजोगाई नगरपरिषद ही अनेक सन्मान प्राप्त नगरपरिषद आहे. या नगर परिषदेला स्वच्छतेचे व इतर पुरस्कार मिळालेले आहे परंतु अंबाजोगाई नगर परिषदेला नुकत्याच लाभलेल्या मुख्य अधिकारी यांनी मनमानी कारभार सुरू केला आहे. मर्जीतील कर्मचाऱ्यांना चांगल्या पदावर बसवणे व दलित समाजातील कर्मचाऱ्यांना अडगळीच्या ठिकाणी टाकने याला मुख्याधिकारी प्राधान्य देत आहेत आंबेजोगाई शहरांमध्ये अनेक प्रश्न भेडसावत असताना मॅडम मात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यामध्येच समाधान मानत आहेत.

शहरांमध्ये नगरपालिकेच्या अनेक जागेवर कब्जे होत आहेत. सर्वात मोठा घोटाळा म्हणजे कुशल आकुशल कर्मचारी यांच्या नावावर उचललेले बीले. जयवंती नदी अक्षरशा अतिक्रमणाने भरली आहे. स्वच्छतेचे तीन तेरा वाजलेले आहेत. शहरामध्ये अनेक ठिकाणी अवैध खोदकाम सुरू आहेत. अनेक मोबाईल कंपन्यांचे केबल वायर) शहरामधील शेकडो पथदिवे बंद असल्याचे मुख्य अधिकारी यांना दिसत नाही का दोन वर्षांपूर्वीचे मुन्सिपल फांडातील बीले मागील महिन्यात व या महिन्यात निघतातच कसे असे अनेक प्रश्न सोडून अंबाजोगाईच्या मुख्याधिकारी या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्येच मग्न आहेत दलिता वरील अन्याय थांबवावा या आशयाचे निवेदन मुख्याधिकारी यांना देताना लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, वंचित चे शहर अध्यक्ष गोविंद भाऊ मस्के, नितीन बप्पा सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमोद भैया दासूद, पत्रकार विराज धिमधिमे, तेरकर व इतर उपस्थित होते.



# सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेबांनी माझ्या निवास्थानी भेट दिली. साहेबांचे येथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी काही निवेदन आणि सामाजिक योजना, याच्यावरती चर्चा झाली. समाजाला नक्कीच न्याय देण्याचा प्रयत्न होईल, असे आश्वासन याप्रसंगी शिरसाट साहेबांनी दिले. यावेळी साहेबानां निवेदन देऊन मागणी केली की रमाई आवास घरकुल योजनेचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यास घरकुल मंजुर झाल्यास शहरी २,५०,०००/– रु. व ग्रामीण १,२०,०००/– रु. एवढी रक्कम मिळत असुन सध्याच्या महागाइच्या युगात या तुटपुंजा रक्कमेत घरकुल बांधण्यामध्ये लाभधारकास अनेक अडचनी निर्माण होत आहेत. लाभ धारकाचे घरकुल या तुटपुंजा रक्कमेत पुर्ण होत नसुन घरकुल अर्धवट आवस्थेमध्ये अपुर्ण राहत असुन लाभ धारकास घरकुलाचा उपयोग होत नाही. त्यामुळे रमाई आवास घरकुल योजनेमध्ये शहरी व ग्रामीण अनुदानीत रक्कमेत वाढ करण्यात यावी ही नम्र विनंती केली.

# वंचित उपेक्षित बहुजन समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर कर्मवीर ॲड. एकनाथ आवाड लढले : जगताप

## ॲड. एकनाथराव आवाडांचा वसा आणि वारसा डॉ. मिलिंद आवाड समर्थपणे चालवत आहेत त्यांना साथ द्या : डॉ. प्रकाश आनंदगावकर




माजलगाव । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान चे संस्थापक कर्मवीर ॲड. एकनाथ आवाड हे उपेक्षित वंचित बहुजन समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर लढले असल्याचे मत मोहनराव जगताप योनी व्यक्त केले तर कर्मवीर एकनाथराव आवाड यांच्या विचाराचा वसा आणि वारसा त्यांचे सुपुत्र डॉ. प्राध्यापक मिलिंद आवाड हे समर्थपणे चालवत आहेत त्यांना आपण साथ द्यावी असे आवाहन प्रसिद्ध डॉ. प्रकाश आनंदगावकर यांनी केले तर उपेक्षित वंचित समाजातील लोकांना बोलायला आणि लढायला एकनाथराव आवाड यांनी शिकवले असल्याचे मत बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले.

कर्मवीर ड. एकनाथराव आवाड यांच्या दहाव्या स्मृती दिन कार्यक्रमाचे आयोजन दि.२५ मे रोजी दुपारी तेलगाव करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाशराव आनंदगावकर होते तर उद्घाटक म्हणून मोहनराव जगताप प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मिलिंद आव्हाड उपस्थित होते. मंचावर दादासाहेब क्षीरसागर, दादासाहेब मुंडे, श्रीमती गयाबाई आवाड, सत्यभामा सौंदरमल, सरपंच दत्तात्रय डाके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, धम्मानंद साळवे, माजी सरपंच अशोकराव लगड, संतोष यादव, एकनाथ मस्के, बाळासाहेब ताकट, शरद यादव, मोहन जाधव, अशोक वाडेकर सर आदी उपस्थित होते.

कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या नावाने समाजामध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्मृती चिन्ह देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी डॉ.प्रा. मिलिंद आवाड, दत्ता डाके, अशोकराव लगड, ॲड. नारायण गोले, उमेश मोगरेकर, सत्यभामा सौदरमल, दादासाहेब मुंडे यांच्यासह मानवी हक अभियान विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष पदाधिकारी यांनी आपल्या भावना व्यक्त करत आवाडांना आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमास महिला, पुरुष मोठ्या व समाजबांधव संख्येने उपस्थित होते.



# चालत्या बसची खिडकी खाली पडून शेतकरी जखमी

## धारूर आगाराचा कारभार

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील महाराष्ट्र राज्य शासन परिवहन महामंडळाच्या धारूर बस आगरामधील बस या खिळखिळ्या झालेल्या असून त्यामुळे ईतर नागरिकांना व वाहनांना धोका होत आहे तरी याकडे धारूर आगारचे कसल्याही प्रकारचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे नागरिकांच्या जीवावर बेतत आहे.

धारूर आगारातील बस आज दि.२८ मे रोजी दुपारी धारूर वरून अंबाजोगाई कडे जात असताना आवरगाव येथील शेतमजूर वैजनाथ उकंडे याच्या अंगावर चालत्या बसची खडकी गळून अंगावर पडली त्यात त्यांना मुक्का मार लागून ते जखमी झाले परंतु बस वाहकाने बस न थांबवता निघून गेली व झालेल्या घटनेबाबत धारूर आगारात माहिती दिली असता आम्हाला अर्ज करून घ्या असे सांगण्यात आले यावरून दिसून येते की यांना कुठल्याही प्रकारचे गांभीर्य राहिलेले नाही.

# महिला आणि बालकांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

## राज्य सरकार आदिशक्ती अभियान राबवणार – सामाजिक कार्यकर्ते ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून, सन २०२५–२६ पासून राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्या सोडवून त्यांना खऱ्या अर्थाने सक्षम बनविणे या अभियानाअंतर्गत ग्रामस्तर ते राज्यस्तरापर्यंत विशेष समित्या स्थापन करून, प्रत्येक ग्रामपंचायतीने अनिवार्य सहभाग नोंदवायचा आहे. पुढील १५ दिवसांत ग्रामसभांच्या माध्यमातून या अभियानाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी सांगितले आहे.



राज्याची सुमारे ६०% लोकसंख्या महिला व बालकांचीच आहे. त्यांच्यापर्यंत शासनाच्या सर्व योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविणे, हा आदिशक्ती अभियानचा मुख्य हेतु आहे.

या अभियानातून आपल्याला काय साध्य करायचे आहे. हुंडा आणि बालविवाह यांसारख्या अनिष्ठ प्रथांचे समुळ उच्चाटन केले जाईल. एकल महिला, विधवा, परित्यक्ता यांच्यासाठी संरक्षण आणि मदतीची यंत्रणा उभारली जाईल. महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबनास चालना दिली जाईल. महिलांना खढख व कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. कायदे, योजना व अधिकार याबाबत जनजागृती केली जाईल. बाल संरक्षण, पोषण, आरोग्य व शिक्षण समित्यांद्वारे सर्वसमावेशक विकास साधला जाईल. किशोरींच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी समित्या काम करतील. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत वृक्षलागवड व त्यांचे संगोपन ग्रामपंचायतीकडून केले जाईल.

या अभियानाचे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार दिले जातील. तालुकास्तर : प्रथम १ लाख, द्वितीय ५० हजार, तृतीय २५ हजार, जिल्हास्तर : प्रथम ५ लाख, द्वितीय ३ लाख, तृतीय १ लाख, राज्यस्तर : प्रथम १० लाख, द्वितीय ७ लाख, तृतीय ५ लाख. या अभियानामुळे राज्यभर सशक्त, सुरक्षित आणि स्वावलंबी महिला सुरक्षित समाज घडविण्याचा महायुती सरकारने निर्धार केला आहे. त्यांचे स्वागत साऊ एकल महिला पुनर्वसन समिती महाराष्ट्र राज्य चे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयावरून मारहाणीत एकाचा मृत्यू तर एक जखमी

युसुफ वडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत अनैतिक संबंधाच्या संशया वरून एका युवकाला त्याची मोटार सायकल अडवून शेतात नेवून झाडाला बांधून केलेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू झाला असून एक जखमी झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले असून एक जण फरार आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील अण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे वय २७ वर्ष रा. भाटुंबा ता. केज व त्याचा मित्र सचिन करपे याला दि. २६ मे रोजी दुपारी ४:३० वा. च्या सुमारास सावळेश्वर ता. केज येथील रोहन मस्के, सोन्या मस्के तसेच लाडेगाव येथील चार ते पाच जणांनी अडवून त्याला रोहन मस्के यांच्या मामाच्या शेतात घेऊन गेले. तेथे त्याला शेतातील झाडाला बांधून त्या सर्वांनी लाकडी काठी आणि बेल्टने अमानुष मारहाण केली आणि त्या नंतर त्याला जखमी अवस्थेत पावनधाम जवळ असलेल्या रस्त्यावर टाकून दिले.




सावरगाव ते सुलेमानदेवाला रस्ता असून अडचण नसून खोळंब अशा प्रकारे रस्त्याची चाळण झाली आहे. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना या रस्त्याचा व खड्ड्याचा त्रास सहन करावा लागतो बरेच दिवसापासून हे काम प्रलंबित आहे. तरी त्वरित या कामाची सुरुवात होईल का अशी अशी आता या रस्त्यावरून चालणाऱ्या वाहनधारकांना लागले. (छायाचित्र शौकत पठाण)

# माणसातील राजकारणी माजी आमदार आर.टी.(जिजा) देशमुख यांचे अपघाती निधन

## रस्त्यावर साचलेल्या पाण्याने केला घात

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी आणी माजलगाव असे दोन तालुक्यात मनामनात आसनारे आर.टी.देशमुख. याची अत्यंत दुर्दैवी घटना माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आर टी जिजा देशमुख यांच अपघाती निधन झाल ही मनाला चटका लावणारी घटना आहे मला अजुनही विश्वास बसत नाही कारण मी शनिवारी दिवस भर जीजा सोबत होतो परंतु त्यां दिवशी सुध्दा गाडी बंद पडली होती पण त्या विवाह सोहळ्याला मोहन भाऊ फंड यांची गाडी त्या ठिकाणी आले होते मी म्हणालो जिजा त्या ड्रायव्हरला विचारा गाडी कस काय चालु होत नाही तेव्हा त्या ड्रायव्हरने सांगितले की लिक्कीड मुळे गाडी चालु होत नाही मग मोहन भाऊ फंड यांचे चिरंजीव आकाश भैय्या फंड यांनी लिक्कीड आहे मी आणून देतो म्हणाले आणि ते गेले तेव्हा जिजा मला म्हणाले आपण तो पर्यंत



तुमच्या मोटारसायकल वर पुंडे होऊ तो पर्यंत गाडी चालू झाली तर ठिक नाहीतर मला कारखान्यांवर सोडा मी म्हणालो ठीक आहे परंतु नंतर जिजानी मोटारसायकल पेगरगव्हाण पाटीवर जेवण करण्यासाठी थांबवली तेवड्यात फपाळ साहेबाचा फोन आला की आकाश भैय्या फंड यांनी लिक्कीड आनले आहे आणि गाडी सुरू झाली तेव्हा मी महनालो आम्ही पेगरगव्हाण पाटीवर थांबलो आहोत नंतर गाडी आली आणि लगेच जिजा म्हणाले तुम्ही माझ्या सोबत गाडित बसा आपुन लोणी तांड्यावर लग्न आहे मी म्हणालो माझी गाडी तर जिजा म्हणाले फपाळ साहेब तुम्ही ही मोटारसायकल पाथरी ला घेऊन या ह्याचं गाडीने जिजाचा सेवट केला आनेक मोठ्या मोठ्या प्रसंगाला जिजा ने हरवले परंतु नियती पुढ कोणचही चालत नाही म्हणतात ना जो आवडे सर्वांना तोच आवडे देवाला बिड जिल्हा नाही तर ह्या माणसांमुळे परभणी जिल्हा सुद्धा हळ हळ करत आहे शेतकरी कष्टकरी कामगार कार्यकर्ते यांच्यासाठी देव होता तो माणूस जिजा तुम्ही जेवड बोललात तेवड आठवण म्हणून आविषयभर जतन करीन पण मला माहित नव्हतं जिजा ही आपली सेवटची भेट होईल आणि जिजाना भावपूर्ण श्रद्धांजली वेळ येईल म्हणून जीजा कायम आठवणीत राहतील.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT